या समवेत:-वार गुरुवार दिनांक ०८/०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. झालेल्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या, सर्वसाधारण सभेचे कामकाज इतिवृत्त जोडले आहे.

---

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/सर्वसाधारण सभा/ee/२०२६
अहिल्यानगर, दिनांक23/02/२०२६

प्रत माहितीसाठी सादर,

1. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
2. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहिल्यानगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,
४. खाते प्रमुख सर्व

2/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील सर्वसाधारण सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके )
सचिव,सर्वसाधारण सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

सर्वसाधारण सभा वार गुरुवार दिनांक ०८ /०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. प्राप्त झालेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या , सर्वसाधारण सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

हजर अधिकारी

| अ.क्र. | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री आनंद भंडारी<br>प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.श्री.विजय मुळीक<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल गुंजाळ<br>सचिव सर्वसाधारण सभा तथा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादा भाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री राजेंद्र देसले<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | श्री संजय कदम<br>प्रभारी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री. सागर चौधरी<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.बाळासाहेब ननवरे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.सुभाष सातपुते<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) |
| ११ | श्री.शिवम डपकर<br>प्र.जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री. एच.बी.चव्हाण<br>प्रभारी कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री सुधीर शिंदे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) |
| १७ | श्रीम संध्या गायकवाड<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री देविदास कोकाटे<br>जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री बाबासाहेब घोरपडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (मु.स.वि.यो.) |
| २१ | श्री बाळासाहेब बुगे<br>शिक्षणाधिकारी (योजना) | | |

**विषय क्रमांक १:-** दिनांक ०१/१२/२०२५ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**ठराव क्र ४२०** - दि . ०१/१२/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**विषय क्रमांक २-** लेखाशिर्ष २२२५ ई १९६ मधील उपसा सिंचन योजना मौजे विहीर (ग्रा.पं.तळे) ता.अकोले .अहिल्यानगर या कामाची निविदा स्विकृत होणे बाबत...

**प्रस्तावना-** उपसा सिंचन योजना मौजे विहीर (ग्रा.पं.तळे) ता.अकोले जि.अहिल्यानगरया कामास मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे कडून दि.११/०३/२०२५ रोजी रक्कम रु.१४३२४८३२/- ची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदरील कामास मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग नाशिक यांच्याकडून तांत्रिक मान्यता आदेश रक्कम रु.१४३२४८३२/- दि.२९/०९/२०२५ रोजी घेण्यात आलेली आहे. सदर कामाची निविदा रक्कम रु.११७१५९१५/- असुन ई-निविदा प्रसिद्धीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| प्रसिद्धीची वेळ | निविदा कालावधी | प्राप्त निविदाधारक | तांत्रिक लिफाफा उघडल्याचा दिनांक | पात्र/अपात्र निविदाधारक | आर्थिक लिफाफा उघडल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दि.१७/१०/२०२५ ते दि.२४/११/२०२५ | ४ | दि.२८/१०/२०२५ | १ पात्र<br>३ अपात्र | ---- | निविदेस दुबार प्रसिद्धी |
| दुसरी | दि.१८/११/२०२५ ते दि.२१/११/२०२५ | ४ | दि.२६/११/२०२५ | ४ पात्र | दि.११/१२/२०२५ | |

उपरोक्त प्रमाणे विषयांकित कामाचे निविदा प्रसिद्धीचे दुसरे वेळी दि.२६/११/२०२५ रोजी उघडणेत आलेल्या तांत्रिक लिफाफ्यात खालीलप्रमाणे पात्र/अपात्र निविदाधारक प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १ | नृसिंह कन्सट्रक्शन (प्रो.नरेंद्र पोळ) | पात्र |
| २ | श्री गणेशकन्सट्रक्शन (प्रो.आरोटे प्रदीप बाळासाहेब) | पात्र |
| ३ | उत्तमभाऊसाहेब नवले | पात्र |
| ४ | मेसाई कन्सट्रक्शन | पात्र |

दि.११/१२/२०२५ रोजी उघडण्यात आलेल्या आर्थिक लिफाफ्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | आर्थिक लिफाफा उघडण्याचा दिनांक | प्राप्त निविदाधारक | प्राप्त दर | न्यूनतम दर असलेल्या निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे विहीर (ग्रा.प.तळे) उपसा सिंचन योजना करणे ता.अकोले जि.अहिल्यानगर | ११७१५९१५/- | दि.११/१२/२०२५ | नृसिंह कन्सट्रक्शन (प्रो.नरेंद्र पोळ) | १३.९९% कमी दराने | उत्तमभाऊसाहेब नवले मु.पो.नवले वाडी ता.अकोले जि.अहिल्यानगर |
| २ | | | | श्री गणेशकन्सट्रक्शन (प्रो.आरोटे प्रदीप बाळासाहेब) | १२.९३% कमी दराने | |
| ३ | | | | उत्तमभाऊसाहेब नवले | १६.००% कमी दराने | |
| ४ | | | | मेसाई कन्सट्रक्शन | १२.५५% कमी दराने | |

नियमातील तरतुद - म.जि.प.व पं.स.लेखा संहिता नियम १९६८ चे नियम १३९ (४) परिशिष्ठ २, भाग २ नुसार व ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन शुद्धीपत्रक दि.८ ऑक्टोबर २०२१ भाग ५ (ब) अन्वये ७५००००१/-ते पुढील निविदा स्विकारण्याचा अधिकार अध्यक्ष सर्वसाधारण सभा जि.प.अहिल्यानगर तथा महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील राजपत्र आदेश व अधिसूचना वार शुक्रवार दि.११ मार्च २०२२ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार प्रस्तुत कामाची निविदा मंजुरीस मा.प्रशासक तथा, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर हे सक्षम प्राधिकारी आहेत.त्यानुसार उपरोक्त विषय मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेत येत आहे.

**विभागाचे अभिप्राय**-सदर कामासाठी श्री.उत्तम भाऊसाहेब नवले मु.पो.नवलेवाडी ता.अकोले जि.अहिल्यानगर यांची १६.००% कमी दराने प्राप्त झालेली निविदा स्विकृतीस मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेस शिफारस आहे.

**ठराव क्र ४२१** -उपसा सिंचन योजना मौजे विहीर (ग्रा.पं.तळे) ता.अकोले जि.अहिल्यानगर या कामास मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे कडून दि.११/०३/२०२५ रोजी रक्कम रु.१४३२४८३२/- ची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदरील कामास मा. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग नाशिक यांच्याकडून तांत्रिक मान्यता आदेश रक्कम रु.१४३२४८३२/- दि.२९/०९/२०२५ रोजी घेण्यात आलेली आहे. सदर कामाची निविदा रक्कम रु.११७१५९१५/- असुन ई-निविदा प्रसिद्धीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| प्रसिद्धीची वेळ | निविदा कालावधी | प्राप्त निविदाधारक | तांत्रिक लिफाफा उघडल्याचा दिनांक | पात्र/अपात्र निविदाधारक | आर्थिक लिफाफा उघडल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दि.१७/१०/२०२५ ते दि.२४/११/२०२५ | ४ | दि.२८/१०/२०२५ | १ पात्र<br>३ अपात्र | ---- | निविदेस दुबार प्रसिद्धी |
| दुसरी | दि.१८/११/२०२५ ते दि.२१/११/२०२५ | ४ | दि.२६/११/२०२५ | ४ पात्र | दि.११/१२/२०२५ | |

उपरोक्त प्रमाणे विषयांकित कामाचे निविदा प्रसिद्धीचे दुसरे वेळी दि.२६/११/२०२५ रोजी उघडणेत आलेल्या तांत्रिक लिफाफ्यात खालीलप्रमाणे पात्र/अपात्र निविदाधारक प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | पात्र/अपात्र |
|---|---|---|
| १ | नृसिंह कन्सट्रक्शन (प्रो.नरेंद्र पोळ) | पात्र |
| २ | श्री गणेशकन्सट्रक्शन (प्रो.आरोटे प्रदीप बाळासाहेब) | पात्र |
| ३ | उत्तमभाऊसाहेब नवले | पात्र |
| ४ | मेसाई कन्सट्रक्शन | पात्र |

दि.११/१२/२०२५ रोजी उघडण्यात आलेल्या आर्थिक लिफाफ्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये | आर्थिक लिफाफा उघडण्याचा दिनांक | प्राप्त निविदाधारक | प्राप्त दर | न्यूनतम दर असलेल्या निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे विहीर (ग्रा.प.तळे) उपसा सिंचन योजना करणे ता.अकोले जि.अहिल्यानगर | ११७१५९१५/- | दि.११/१२/२०२५ | नृसिंह कन्सट्रक्शन (प्रो.नरेंद्र पोळ) | १३.९९% कमी दराने | उत्तम भाऊसाहेब नवले मु.पो.नवले वाडी ता.अकोले जि.अहिल्यानगर |
| २ | | | | श्री गणेश कन्सट्रक्शन (प्रो.आरोटे प्रदीप बाळासाहेब) | १२.९३% कमी दराने | |
| ३ | | | | उत्तम भाऊसाहेब नवले | १६.००% कमी दराने | |
| ४ | | | | मेसाई कन्सट्रक्शन | १२.५५% कमी दराने | |

नियमातील तरतुद - म.जि.प.व पं.स.लेखा संहिता नियम १९६८ चे नियम १३९ (४) परिशिष्ट २, भाग २ नुसार व ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन शुद्धीपत्रक दि.८ ऑक्टोबर २०२१ भाग ५ (ब) अन्वये ७५०००००१/-ते पुढील निविदा स्विकारण्याचा अधिकार अध्यक्ष सर्वसाधारण सभा जि.प.अहिल्यानगर तथा महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील राजपत्र आदेश व अधिसूचना वार शुक्रवार दि.११ मार्च २०२२ मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार प्रस्तुत कामाची निविदा मंजुरीस मा.प्रशासक तथा, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर हे सक्षम प्राधिकारी आहेत. लेखाशिर्ष २२२५ ई १९६ मधील उपसा सिंचन योजना मौजे विहीर (ग्रा.पं.तळे) ता.अकोले जि.अहिल्यानगर या कामाची निविदा स्विकृतीस व सदर कामासाठी श्री.उत्तम भाऊसाहेब नवले मु.पो.नवलेवाडी ता.अकोले जि.अहिल्यानगर यांची १६.००% कमी दराने प्राप्त झालेली निविदा स्विकृतीस या ठरावा द्वारे कामाची निविदा स्विकृत करणेत येत आहे.

## विषय क्रमांक ३– जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ मध्ये लेखाशिर्ष २२१०-H६९७ पुनर्विनियोजनाद्वारे अतिरिक्त निधी प्राप्त झालेनुसार Vel Scope Vs (Tissue Fluroscene visualization device / Oral disease discovery tool) उपकरण /साहित्यसामुग्री खरेदीकरिता जेम निविदेतील आर्थिक लिफाफ्यातील प्राप्त न्यूनतम दर मंजूर करण्यात येऊन निविदा स्विकृतीबाबत व पुढील खरेदी प्रक्रियेस मान्यता मिळणेबाबत (रक्कम रु ७५० लक्ष)

प्रस्तावना-

अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रामध्ये एकुण १०४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५८४ उपकेंद्रे २ आयुर्वेदिक दवाखाने,व पाच प्राथमिक आरोग्य पथके कार्यान्वीत आहेत. सदर आरोग्य संस्थामार्फत ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा देण्याचे काम चालु आहे.

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी औषधी साहित्यसाधनसामुग्री खरेदी या योजनेअंतर्गत २२१० H ६९७ लेखाशिर्षांतर्गत ,रु .५०० लक्ष नियतव्यय मंजुरी आदेशाच्या दीड पट रु. ७५० लक्ष रक्कमेस खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता मा .जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार समिती दिनांक २९/१०/२०२५ रोजीच्या ठराव क्र . ३९० अन्वये मा .मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दिनांक ३१/१०/२०२५ रोजीच्या मंजूर टिपणीअन्वये प्राप्त झालेली आहे .

तक्ता अ

| अ.क्र | बाब | शासकीय लेखाशिर्ष | यापूर्वी मंजूर निधी सन २०२५-२६ | पुनर्विनियोजनाद्वारे अतिरिक्त निधी सन २०२५-२६ मंजुर तरतुद | दीड पटीच्या मर्यादित प्रशासकीय मान्यतेस्तव व निधी मंजूरीस्तव रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रा.आ.केंद्राकरीता / उपकेंद्राकरीता औषध साधन सामुग्री, व यंत्रसाधन सामुग्री खरेदी | २२१०- H६९७ | रु .४००.०० लक्ष | रु .५००.०० लक्ष | रु . ७५० लक्ष | |

त्यानुसार ,जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निधी मागणी करण्यात आलेली आहे.

जिल्ह्यातील तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,__ (सर्व) कार्यालयांनी सादर केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या एकत्रित मागणीनुसार आणि सिव्हिल हॉस्पीटल अंतर्गत संस्था ग्रामीण रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालय,ई.ठिकाणी यांनी कर्कुरोग रुग्णांचे निदान लवकरात लवकर करण्यासाठी Vel Scope Vs (Tissue Fluroscene visualization device/Oral disease discovery tool) सदर उपकरणाच्या वापरासाठी केलेल्या आवश्यक मागणी नुसार सदर योजनेतून आवश्यक Vel Scope Vs (Tissue Fluroscene visualization device / Oral disease discovery tool) उपकरण /साहित्यसामुग्री करण्यासाठी मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ ,नाशिक या कार्यालयाकडील तांत्रिक मान्यता मंजुरी आदेश जा .क्र . उपसंआसे /अवैद्यकीय भांडार /जि प अहिल्यानगर /जिवायो -२०२५-२६/तां मा आ /५२६८५-८८/२५ दिनांक १३/११/२०२५ रोजी रक्कम रु . ७५० लक्ष खरेदी प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे .

आरोग्य विभागाअंतर्गत Tissue Fluroscene visualization device (Oral disease discovery tool ) खरेदीसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. अहिल्यानगर यांचेकडील मंजूर टिपणी दिनांक -२४/११/२०२५ अन्वये, जेम निविदा क्रमांक GEM /२०२५/बी /६९३२१६७ प्रसिद्ध दिनांक- २७/११/२०२५ ते १८/१२/२०२५ जेम - निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे .

सदर जेम -निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक -१९/१२/२०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता उघडण्यात आलेला आहे.

सदर निविदेमध्ये खालीलप्रमाणे तीन निविदाधारकांनी भाग घेतल्याचे निदर्शनास आले .

१) M V Meditech

२) San Pharma

३) Sure Surgicals

मा .जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या जा.क्र.भांडार/ १४६/२०२५ दिनांक- १९/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निविदेतील समाविष्ट असलेल्या निविदाधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करणे कामी समिती निश्चित करण्यात आलेली होती . छाननी समिती तपासणी अहवालाप्रमाणे (After giving ४८ hours time in Clarification For Representation for short Fall Documents on GEM Portal ) नंतर कागदपत्रांची तपासणी करण्यात येऊन सर्व निविदाधारक पात्र ठरत आहेत .

अर्थ विभागाच्या अभिप्रायांनंतर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दिनांक २४/१२/२०२५ रोजीच्या मंजूर टिपणीन्वये तांत्रिक लिफाफा पात्र /अपात्र वर स्वाक्षरी मंजूर करण्यात येऊन आर्थिक लिफाफा उघडण्यास मान्यता मिळालेली आहे .

विभागाने GEM पोर्टल वर ऑनलाईन पद्धतीने आर्थिक लिफाफा दिनांक- २४/१२/२०२५ रोजी उघडण्यात आला .

निविदेतील सदर आर्थिक लिफाफ्यात संबंधित पुरवठाधारकांनी दर सादर करण्यात आलेनुसार आर्थिक लिफाफा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे .

तक्ता ब) Financial Evaluation Chart GEM Bid No.२०२५/B/६९३२१६७

| SR NO | NAME OF Bidder/Tenderer /Seller | Name Of Item Category | Total Bid PriceFor २७ Units in Rs.(Inclusive all taxes) | Per Unit/Device Price Rs.(Inclusive all taxes) | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| १ | San Pharma | Tissue Fluroscence Visualisation Device | ७४७,९०,००० | २७,७०,००० | L १ |
| २ | M V Meditech | Tissue Fluroscence Visualisation Device | ७४९,२५,००० | २७,७५,००० | L २ |
| ३ | Sure Surgicals | Tissue Fluroscence Visualisation Device | ७५३,५७,००० | २७,९१,००० | L ३ |

विभागाने Base रेट/ Estimated rate ग्राह्य धरताना तांत्रिक विनिर्देशानुसार सदर उपकरणाची बाजारभाव किंमत दर लक्षात घेण्यासाठी इतर ठिकाणचे मागील तीन वर्षातील पुरवठा आदेश देण्यात आलेनुसार Tissue Fluroscene visualization device ची किंमत ग्राह्य धरून खरेदीची वास्तविक किंमत आणि अंदाजित किंमत यामधील (-२० % व +१० %) तफावत लक्षात घेऊन तांत्रिक मान्यतेस्तव अंदाजित किंमत प्रति नग उपकरणासाठी रु.२७.७७ लक्ष नुसार तांत्रिक मान्यता प्रस्ताव रु . ७५० लक्ष रक्कमेचा सादर करण्यात आलेला होता त्यानुसार ,तांत्रिक मान्यता आदेश प्राप्त झालेले आहेत .

तांत्रिक मान्यता किमतीपेक्षा सदर निविदेत प्राप्त झालेले दर हे कमी असल्याने आणि मागील तीन वर्षातील इतर ठिकाणच्या पुरवठा आदेशापेक्षा प्राप्त न्यूनतम दराची (-२० % व +१० %) तफावत लक्षात घेता सदर न्यूनतम दर रक्कम रु.२७.७० लक्ष मंजूरीस्तव मा .जिल्हास्तरीय खरेदी समिती समोर दिनांक ३०/१२/२०२५ रोजी विषय सादर करण्यात आला .

त्यानुसार ,मा .जिल्हास्तरीय खरेदी समिती सभा दिनांक -३०/१२/२०२५ रोजी सदर विषयावर चर्चा करण्यात येऊन मंजूर ईतिवृत्त ठराव क्र . २ नुसार उपरोक्त तक्ता ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे न्यूनतम दर धारक सॅन फार्मा यांचे दर मंजूर करण्यात येऊन प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्याप्रमाणे रक्कम रु.७५० लक्ष मधून पुरवठा आदेश देण्यास पुढील खरेदी प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात आलेली आहे .

आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,अहिल्यानगर अंतर्गत संस्थांकरिता Tissue Fluroscene visualization device (Oral disease discovery tool/Cancer Detection Device) उपकरण साहित्य सामुग्री खरेदीसाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ च्या पुनर्विनियोजनातून प्राप्त झालेल्या लेखाशिर्ष २२१० H६९७ च्या अनुदानातून तांत्रिक मान्यता रक्कम रु. ७५०लक्ष रक्कमेतून संबधित न्यूनतम दर निविदाधारक San Pharma यांना Tissue Fluroscene visualization device Vel Scope-VX /Oral disease discovery tool) उपकरण खरेदी करण्यासाठी उपरोक्त तक्ता ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे दर मंजूर करण्यात येऊन निविदा स्विकृत करण्यात येऊन खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वित्तीय नियमावलीचे पालन करण्यात येऊन निविदा अटी व शर्तीप्रमाणे पुरवठा आदेश देणेस पुढील खरेदी प्रक्रिया करणेस मान्यतेस्तव विषय सादर करण्यात येत आहे.

तक्ता - क ) जिल्हा सर्वसाधारण वार्षिक योजना- अनुदान सन २०२५-२६ प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी औषधी साहित्यसामुग्री खरेदी योजना (लेखाशिर्ष-२२१० H६९७ तांत्रिक मान्यता प्राप्त रक्कम रु. ७५० लक्ष प्रस्तावित Tissue Fluroscene visualization device §(Oral disease discovery tool खरेदी) पुरवठा आदेश देण्यास्तव खरेदी प्रस्ताव-

| Sr. No. | Name of Items. | Demand | TS Qty | TS rate | L१Rate (Inclusive all Taxes ) Per unit With Door Delivery | Qty. to be purchsed | Total Supply Order Amount (In Rs.) | Name Of L१ Supplier | Mode Of Purchase |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Tissue luroscene visualization device (Oral disease discovery tool | २८ | २७ | २७.७७ Lakh | २७.७० Lakh | २७ | ७४७,९०,००० | San Pharma, Solapur | Gem Bid/ Tender L१ rate |

सदर योजनेतून खरेदी करावयाची रक्कम रु . ७५० लक्ष ही रु.५० लक्ष पेक्षा जास्त असल्याने Vel Scope Vs (Tissue Fluroscene visualization device Oral disease discovery tool) उपकरण /साहित्यसामुग्री खरेदीकरिता जेम निविदेतील आर्थिक लिफाफ्यातील प्राप्त न्यूनतम दर मंजूर करण्यात येऊन निविदा स्विकृतीबाबत व पुढील खरेदी प्रक्रियेस मान्यता घेणेसाठी महाराष्ट्र शासन ,ग्रामविकास विभाग ,शा.नि.क्र . झेपिए -२०१६/प्र.क्र .५६/वित्त-९ मुंबई ३२ दिनांक -०७/१०/२०१७ अन्वये मा .जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा सक्षम आहे .

तथापि,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग राजपत्र असाधारण क्र . २६ दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये कार्यकाल दिनांक २०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आला आहे .त्यामध्ये जिल्हा परिषद अ.नगर चा समावेश आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग ,मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि १/परिषद /३३४/२०२२ अ.नगर दिनांक २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली आहे .तरी सदरच्या विषयास योजनेतून खरेदी प्रक्रियेस मान्यतेस्तव मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार समिती समोर सविनय सादर

मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय

सामान्य प्रशासन विभाग, मुंबई १ जा.क्रं.साप्रवि१/परिषद/३३४/२०२२ अहमदनगर दि.२८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंमलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली असल्याने जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेल्या जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ च्या पुनर्विनियोजनातून प्राप्त झालेल्या लेखाशिर्ष २२१०H६९७ अंतर्गत मंजूर अनुदानातून Vel Scope Vs (Tissue Fluroscene visualization device Oral disease discovery tool) उपकरण/साहित्यसामुग्री खरेदी प्रक्रियेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निधी मागणी करण्यात आलेली आहे . मा .उपसंचालक ,आरोग्य सेवा ,नाशिक मंडळ ,नाशिक यया कार्यालयाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असल्याने विभागाने वित्तीय नियमावलीचे पालन करण्यात येऊन GEM निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे .

उपरोक्त प्रमाणे] Tissue Fluroscene visualization device Vel Scope-VX /Oral disease discovery tool) उपकरण खरेदी करण्यासाठी सदर विषयावर मा .जिल्हा स्तरीय खरेदी समिती सभेमध्ये चर्चा होऊन, च्या तांत्रिक मान्यता रक्कम रु . ७५० लक्ष मधून तांत्रिक मान्यतेच्या अटी व शर्तीस अधिन राहून विभागाने प्रसिद्ध करण्यात आलेल्या जेम निविदेतील आर्थिक लिफाफा दर तुलनात्मक तक्ता तक्ता ब मधील दर प्राप्त झालेनुसार एल १ निविदाधारक San Pharma यांचे दर मंजूर करण्यात येऊन ,वित्तीय नियमावलीचे पालन करण्यात येऊन शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर २०१६ नुसार आणि निविदा अटी व शर्तीप्रमाणे Tissue Fluroscene visualization device (Oral disease discovery tool §For Cancer Detection )उपकरण खरेदी करणेस्तव संबंधित San Pharma निविदाधारकास उपरोक्त तक्ता क मध्ये दर्शविल्याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यास खरेदी करावयाची रक्कम रु . ७५० लक्ष ही रु . ५० लक्ष पेक्षा जास्त असल्याने आर्थिक लिफाफ्यातील प्राप्त न्यूनतम दर मंजूर करण्यात येऊन निविदा स्विकृतीबाबत व पुढील खरेदी प्रक्रियेस मान्यता घेणेसाठी महाराष्ट्र शासन ,ग्रामविकास विभाग ,शा.नि.क्र . झेपिए -२०१६/प्र .क्र. ५६/वित्त-९ मुंबई ३२ दिनांक -०७/१०/२०१७ अन्वये मा .जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा सक्षम आहे .

Vel Scope Vs (Tissue Fluroscene visualization device Oral disease discovery tool) उपकरण /साहित्यसामुग्री खरेदीकरिता जेम निविदेतील आर्थिक लिफाफ्यातील प्राप्त न्यूनतम दर मंजूर करण्यात येऊन निविदा स्विकृतीबाबत व पुढील खरेदी प्रक्रियेस मान्यता घेणेसाठी सदरचा विषय मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता मिळणेस सविनय सादर

**ठराव क्र ४२२**– जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी औषधी साहित्यसाधनसामुग्री खरेदी या योजनेअंतर्गत २२१० H ६९७ लेखाशिर्षातर्गत मा.जिल्हा नियोजन अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,अहिल्यानगर या कार्यालयाकडील पुनर्विनियोजनाद्वारे अतिरिक्त निधी नियतव्यय मंजूर पत्र जा.क्र.जिनिस/जिवायो/२०२५-२६/ससंअ /२/१६१४/२०२५ दिनांक- २७/१०/२०२५ अन्वये, मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार समिती दिनांक २९/१०/२०२५ रोजीच्या ठराव क्र . ३९० अन्वये Vel Scope Vs (Tissue Fluroscene visualization device -Oral disease discovery tool) उपकरण /साहित्यसामुग्री खरेदीसाठी मा .मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दिनांक ३१/१०/२०२५ रोजीच्या मंजूर टिपणीअन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे .

मा .उपसंचालक ,आरोग्य सेवा ,नाशिक मंडळ ,नाशिक या कार्यालयाकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असल्याने तांत्रिक मान्यता रक्कम रु . ७५० लक्ष मधून तांत्रिक मान्यतेच्या अटी व शर्तीस अधिन विभागाने वित्तीय नियमावलीचे पालन करण्यात येऊन GEM निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे .

GEM निविदेतील आर्थिक लिफाफा दर तुलनात्मक तक्ता नुसार खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत .

तक्ता ब) Financial Evaluation Chart §GEM Bid No.२०२५/B/६९३२१६७

| SR NO | NAME OF Bidder/Tenderer/ Seller | Name Of Item Category | Total Bid PriceFor २७ Units in Rs.(Inclusive all taxes) | Per Unit/Device Price Rs.(Inclusive all taxes) | Remarks |
|---|---|---|---|---|---|
| १ | San Pharma | Tissue Fluroscence Visualisation Device | ७४७,९०,००० | २७,७०,००० | L १ |
| २ | M V Meditech | Tissue Fluroscence Visualisation Device | ७४९,२५,००० | २७,७५,००० | L २ |
| ३ | Sure Surgicals | Tissue Fluroscence Visualisation Device | ७५३,५७,००० | २७,९१,००० | L ३ |

उपरोक्त प्रमाणे] Tissue Fluroscene visualization device §Vel Scope-VX /Oral disease discovery tool) उपकरण खरेदी करण्यासाठी सदर विषयावर मा.जिल्हा स्तरीय खरेदी समिती सभेमध्ये दिनांक ३०/१२/२०२५ रोजी चर्चा होऊन आर्थिक लिफाफ्यात दर प्राप्त झालेनुसार न्यूनतम दर मंजूर करण्यात येऊन पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.,

तथापि,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग राजपत्र असाधारण क्र .२६ दिनांक ११ मार्च २०२२ अन्वये कार्यकाल दिनांक -२०/०३/२०२२ रोजी संपुष्टात आला आहे .त्यामध्ये जिल्हा परिषद अ.नगर चा समावेश आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग .मुंबई १ जा.क्र. सा.प्र.वि१/परिषद /३३४/२२ अ.नगर दिनांक २८/०३/२०२२ अन्वये प्रशासक कालावधीत जिल्हा परिषद

स्तरावरील विविध विकास कामे व योजना अंबलबजावणीसाठी निर्णय घेण्यासाठी विविध स्तरांवर सल्लागार समिती नियुक्ती केली आहे .तरी सदरच्या विषयान्वये नमूद केल्याप्रमाणे, सदर औषधी खरेदी निविदा रक्कम र. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्याने त्याबाबतचे अधिकार जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेस असल्याने आणि Tissue Fluroscene visualization device §Vel Scope-VX /Oral disease discovery tool खरेदी प्रक्रिया अत्यावश्यक बाब असल्याने जेम निविदा आर्थिक लिफाफा दर तुलनात्मक तक्त्यानुसार न्यूनतम दर मंजूर करून जिल्हास्तरावर उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून सदर उपकरण खरेदी करणेस्तव मंजूर दराने निविदा स्विकृत करून दर मंजूर करण्यात येऊन खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करणेसाठी मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार समिती समोर विषय सादर करण्यात आलेला आहे .

त्यानुसार ,सदर योजनेतून खरेदी करावयाची रक्कम रु. ७५० लक्ष ही रु. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्याने त्यानुसार,उपरोक्त तक्ता ब मधील दर प्राप्त झालेनुसार एल १ निविदाधारक San Pharma यांचे न्यूनतम दर मंजूर करण्यात येऊन ,वित्तीय नियमावलीचे पालन करण्यात येऊन शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर २०१६ नुसार आणि निविदा अटी व शर्तीप्रमाणे Tissue Fluroscene visualization device (Oral disease discovery tool For Cancer Detection )उपकरण खरेदी करणेस्तव निविदा स्विकृत करण्यात येऊन न्यूनतम मंजूर दरानुसार संबंधित San Pharma निविदाधारकास खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पुरवठा आदेश देणेस्तव खरेदी प्रक्रिया करण्यास मा.जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या वतीने मान्यता देण्यात येत आहे .

| Sr. No. | Name of Items | Demand | TS Qty | TS rate | L१ Rate (Inclusive all Taxes ) Per unit With Door Delivery) | Qty. to be purchsed | Total Supply Order Amount (In Rs.) | Name Of L१ Supplier | Mode Of Purchase |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Tissue Fluroscene visualization device - (Oral disease discovery tool) | २८ | २७ | २७.७७ Lakh | २७.७० Lakh | २७ | ७४७,९०,००० | San Pharma, Solapur | Gem Bid/ Tender L१ rate |

**विषय क्रमांक ४–** अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागां अंतर्गत मौजे मिरी ता.पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र निर्लेखन करणेच्या प्रस्तावास मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :- अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागां अंतर्गत मौजे मिरी ता.पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र निर्लेखन करणेच्या प्रस्ताव वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र मिरी ता पाथर्डी यांचकडील पत्र क्रं आरोग्य/आस्था/१६०/२०२५ दिनांक २३.७.२०२५ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदरचे प्रस्ताव मंजुरीस्तव बांधकाम दक्षिण विभाग जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचेकडे सादर केले असता. कार्यकारी अभियंता, यांचेकडील पत्र क्र बांध/चिशा/४६६/२०२५ दिनांक ३०.९.२०२५ अन्वये सदरचे प्रस्ताव मान्यतेस्तव मा.अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहिल्यानगर यांचे कडे सादर केले असता त्यांचेकडील पत्र क्र प्रशा-५/दक्षिण/४५५०/२०२५ दिनांक १७.११.२०२५ अन्वये आपण सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती सत्य असल्याचे गृहीत धरण्यात येत आहे. परंतु भविष्यात नविन इमारतीचे बांधकाम करताना भुकंप रोधक बाबींचा समावेश करण्याच्या अटींच्या अधीन राहून सदरची जिल्हा परिषद मालकीच्या जागेतील मौजे मिरी.ता.पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत जुन्या धोकादायक/ झालेल्या/ मोडकळीस आलेल्या खोल्या संख्या ०१ खालील अटी व शर्तीना आधीन राहून सदरच्या प्रस्तावास सहमती देण्यात येत आहे असे नमुद केले आहे.

मौजे मिरी ता पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत संख्या ०१ क्षेत्रफळ ३६४.६८ चौ.फुट मा.सहसंचालक,आरोग्य सेव,मंुबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.आसे/ प्राआकें जिपस्तर /प्राआकेंउपके/ मोडकळीस/परवानगी/मंजूर संख्या/ कक्ष ७अ/13 दि.२५.११.२०१३ नुसार मोडकळीस आलेल्या इमारती बांधकाम पाडण्यांस परवानगी देणेकामी प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येणा-या प्रस्तावासोबत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचा मंजुरीचा ठराव सादर करणे आवश्यक आहे.

तथापी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्र.साप्रवि-१/परिषद/३३४/२०२२ दि.२८.३.२०२२ अन्वये आदेशित केलेनुसार प्रशासक कालावधीत सल्लागार समिती याची मान्यता आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने वरील नमुद केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र निर्लेखनास दि.११/१२/२०२५ रोजीच्या आरोग्य समितीच्या अनुषंगाने सल्लागार समितीने मान्यता दिलेली आहे.

विभागाचा अभिप्राय मौजे मिरी ता पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत निर्लेखन करण्यास मान्यता देण्यात यावी

**ठराव क्र ४२३**– अहिल्यानगर जिल्हा परिषद आरोग्य विभागां अंतर्गत मौजे मिरी ता.पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र निर्लेखन करणेच्या प्रस्ताव वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र मिरी ता पाथर्डी यांचकडील पत्र क्र आरोग्य/आस्था/१६०/२०२५ दिनांक २३.७.२०२५ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

सदरचे प्रस्ताव मंजुरीस्तव बांधकाम दक्षिण विभाग जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचेकडे सादर केले असता. कार्यकारी अभियंता, यांचेकडील पत्र क्र बांध/चिशा/४६६/२०२५ दिनांक ३०.९.२०२५ अन्वये सदरचे प्रस्ताव मान्यतेस्तव मा.अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहिल्यानगर यांचे कडे सादर केले असता त्यांचेकडील पत्र क्र प्रशा-५/दक्षिण/४५५०/२०२५ दिनांक १७.११.२०२५ अन्वये आपण सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती सत्य असल्याचे गृहीत धरण्यात येत आहे. परंतु भविष्यात नविन इमारतीचे बांधकाम करताना भुकंप रोधक बाबींचा समावेश करण्याच्या अटींच्या अधीन राहून सदरची जिल्हा परिषद मालकीच्या जागेतील मौजे मिरी.ता.पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत जुन्या धोकादायक/ झालेल्या/ मोडकळीस आलेल्या खोल्या संख्या ०१ खालील अटी व शर्तीना आधीन राहून सदरच्या प्रस्तावास सहमती देण्यात येत आहे असे नमुद केले आहे.

मौजे मिरी ता पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत संख्या ०१ क्षेत्रफळ ३६४.६८ चौ.फुट मा.सहसंचालक,आरोग्य सेवा,मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र.आसे/ प्राआके जिपस्तर /प्राआकेउपके/ मोडकळीस/परवानगी/मंजूर संस्था/ कक्ष ७अ/१३ दि.२१.११.२०१३ नुसार मोडकळीस आलेल्या इमारती बांधकाम पाडण्यांस परवानगी देणेकामी प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात येणा-या प्रस्तावासोबत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचा मंजुरीचा ठराव सादर करणे आवश्यक आहे.

तथापी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्र.साप्रवि-१/परिषद/३३४/२०२२ दि.२८.३.२०२२ अन्वये आदेशित केलेनुसार प्रशासक कालावधीत सल्लागार समिती याची मान्यता आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने वरील नमुद केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र निर्लेखनास दि.११/१२/२०२५ रोजीच्या आरोग्य समितीच्या अनुषंगाने सल्लागार समितीने मान्यता दिलेली आहे.

प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार मौजे मिरी ता पाथर्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत निर्लेखन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ५- विशेष घटक योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या नियतव्ययातून सन २०२५-२०२६ मध्ये ग्रामिण भागातील अनुसूचित जातीतील गरोदर स्तनदा मातांना तसेच ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना अतिरिक्त आहार मल्टी मिलेट न्युट्रिशन किट पुरविणे योजनेस प्रशासकीय मान्यता देणे बाबत.**

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विशेष घटक योजना राबविणेसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अहिल्यानगर यांचे कडील पत्र क्रमांक सआसक/अन/अजाघका/निधीमागणी बाबत /२०२५-२०२६/ १६९५ दिनांक ०६ जुन २०२५ अन्वये महिला व बाल कल्याण विभागास सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी मुख्यलेखाशिर्ष २२२५ ई ५५२ -३१ अंतर्गत रक्कम रुपये ३००.०० लक्ष नियतव्यय प्राप्त झालेले असून महिला व बाल कल्याण सल्लागार समिती सभा दिनांक ३१/०७/२०२५ ठराव क्रमांक ६ अन्वये जिल्हयातील ग्रामिण भागातील अनुसुचित जातीतील किशोरवयीन मुलींना तसेच महिलांना सॅनेटरी नॅपकीन पुरविणे बाबत योजना घेणेत आली होती. तथापी सदर योजनेच्या निविदेस निविदाधारकांचा प्रतीसाद न मिळाल्यामुळे सदर योजना दिनांक ०७/०१/२०२६ रोजी झालेल्या महिला व बाल कल्याण सल्लागार समिती बैठकीमध्ये रदद करणेत येऊन तसेच त्या ऐवजी ग्रामिण भागातील अनुसूचित जातीतील गरोदर स्तनदा मातांना तसेच ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना अतिरिक्त आहार मल्टी मिलेट न्युट्रिशनल किट पुरविणेबाबत योजना घेण्यात आलेली आहे.

सदर योजनेवर रक्कम रुपये ८५.०० लक्ष तरतूद करणेत आलेली आहे. जिल्हयातील ग्रामिण भागातील अनुसूचित जातीतील गरोदर स्तनदा मातांना तसेच ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना अतिरिक्त आहार मल्टी मिलेट न्युट्रिशन किट पुरविणे योजनेस प्रशासकीय मान्यता देणे बाबत महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२०१६प्रक्र ५६/वित्त-९/मंत्रालय मुंबई दिनांक ०७ ऑक्टोबर २०१७ मधील भाग -२ अन्वये रु.५०.०० लक्ष च्या वरील योजनांना प्रशासकीय मान्यता देणेस जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा सक्षम आहे. त्या अनुषंगाने पुर्वी घेण्यात आलेली प्रशासकीय मान्यता रदद करणे तसेच नव्याने घेण्यात आलेल्या योजनेस प्रशासकीय मान्यता देणेस मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी हे सक्षम आहेत. तथापी सदर योजनेस जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार समिती समोर विषय ठेवण्यासाठीचे प्रारुप ठेवण्यात आलेले आहे.

**ठराव क्र ४२४-** जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत विशेष घटक योजना राबविणेसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अहिल्यानगर यांचे कडील पत्र क्रमांक सआसक/अन/अजाघका/निधीमागणी बाबत /२०२५-२०२६/ १६९५ दिनांक ०६ जुन २०२५ अन्वये महिला व बाल कल्याण विभागास सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रुपये ३००.०० लक्ष नियतव्यय प्राप्त झालेले असुन महिला व बाल कल्याण सल्लागार समिती सभा दिनांक ३१/०७/२०२५ ठराव क्रमांक ६ अन्वये जिल्हयातील ग्रामिण भागातील अनुसूचित जातीतील किशोरवयीन मुलींना तसेच महिलांना मोफत सॅनेटरी नॅपकीन पुरविणे योजना घेण्यात आली होती सदर योजना तांत्रिक बाबीमुळे महिला व बाल कल्याण सल्लागार समिती सभा दिनांक ०७/०१/२०२६ ठराव क्रमांक २४ अन्वये योजना व योजनेची प्रशासकीय मान्यता रदद करण्याबाबत शिफारस केलेली असून त्या ऐवजी आता अंगणवाडीतील अनुसूचित जातीतील गरोदर स्तनदा

मातांना तसेच ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना त्यांचे आरोग्याचे दृष्टिने त्यांना अतिरिक्त आहार मल्टि मिलेट न्युट्रीशनल किट पुरविणे बाबत योजना घेणेचे ठरलेले आहे. सदर योजनेवर रक्कम रुपये ८५.०० लक्ष अक्षरी पंच्याऐंशी लाख मात्र तरतूद करणेत आलेली आहे सदर योजनेस प्रशासकीय मान्यता घेणे प्रस्तावीत आहे.

सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देणे बाबत महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए/२०१६प्रक्र ५६/वित्त-९/मंत्रालय मुंबई दिनांक ०७ ऑक्टोबर २०१७ मधील भाग -२ अन्वये रु ५०.०० लक्षाच्या वरील रक्कमेच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देणेस जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार सभा सक्षम आहे. तथापी जिल्हा परिषदांचा कार्यकाल दिनांक २० मार्च २०२२ पासुन संपुष्टात आलेला असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम ९१ ब व ७५ ब या कलमान्वये महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्य पार पाडण्यासाठी २१ मार्च २०२२ पासुन जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विषय समित्यांचे सभापती, यांचे सर्व अधिकारांचा वापर करणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना सर्व अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे कडील पत्र क्रमांक साप्रवि/१/परिषद/ ३३४/ २०२२ अहमदनगर दिनांक २८/०३/२०२२ अन्वये योजनांची अंमलबजावणी करणे सुलभ व्हावे यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर विविध सल्लागार समितींची नियुक्ती करणेत आलेली आहे. त्या नुसार जिल्हा परिषद सर्वसाधारण सल्लागार समितीचे गठण करणेत आलेले आहे. महिला व बाल कल्याण विभागाने ग्रामिण भागातील अनुसुचित जातीतील किशोरवयीन मुलींना तसेच महिलांना मोफत सॅनेटरी नॅपकीन पुरविणे योजना व योजनेची प्रशासकीय मान्यता रदद करणे व त्याऐवजी नव्याने प्रस्तावीत करण्यात आलेली योजना ग्रामिण भागातील अनुसुचित जातीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना तसेच गरोदर स्तनदा मातांना त्यांचे आरोग्याचे दृष्टिने त्यांना अतिरिक्त आहार मल्टि मिलेट न्युट्रीशनल किट पुरविणे योजना रक्कम रुपये ८५.०० लक्ष अक्षरी पंच्याऐंशी लाख मात्र योजनेस या ठरावाव्दारे प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

## विषय क्रमांक ६– अकोले तालुक्यातील नवनिर्मित ग्रामपंचायत खानापुर येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकामासाठी ०.०५ आर जागा देणेबाबत.

संदर्भ :- १. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ मधील कलम १२८, पोट कलम १(ब)
२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए. १०८७/सीआर/२८५३/२८ मंत्रालय मुंबई-३२ दि. २४ मार्च १९८७.
३. ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. पंरास-२०१०/प्र. क्र. १४०/पं. रा .- ९, दि.२९.०५.२०१४
४. गटविकास अधिकारी, पं.स.अकोले यांचेकडील पत्र क्र.ग्रापं-३/७५९/२५, दि.२४.०६.२०२५.

अकोले या आदिवासी बहुल तालुक्यातील खानापुर हि अतिशय लहान ७ सदस्यीय ग्रामपंचायत आहे. सदर ग्रामपंचायतीला ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध नाही. ग्रामपंचायतीचे कायक्षेत्राचे भुमापन क्र.१७/१३ क्षेत्र ०.७१ आर ही जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मालकीची असुन त्यामध्ये जिल्हा परिषदेचे अतिथी गृह सोडले तर उर्वरित सर्व जागा बखळ पडलेली आहे. खानापुर ग्रामपंचायती अंतर्गत लोकवस्ती विखरुलेल्या स्वरुपात असल्याने सर्व वस्त्यांचे मध्यवर्ती ठिकाण हे भूमापन क्र.१७/१३ मधील ०.७१ आर पैकी सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे ०.०५ आर क्षेत्र पश्चिम दक्षिण कोप-यात अकोले शेरणखेल रस्त्यालगत ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकामाकरीता मिळणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ नुसार सादर करण्यात आलेला आहे.

मौजे खानापुर,ता.अकोले ग्रामसभा ठराव क्र.१०, दि.३१.०५.२०२५ नुसार खानापुर गावासाठी नवीन ग्रामपंचायतीची दि. १०.०१.२०२३ रोजी स्थापना झाली असुन ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र इमारत नाही. यावर ग्रामसभेत सविस्तर चर्चा होऊन भूमापन क्र.१७/१३ मध्ये ०.७१ आर क्षेत्र असुन त्यात विश्रामगृहाचे बांधकाम केलेले असून उर्वरित जागा शिल्लक आहे. शिल्लक असलेल्या

क्षेत्रातुन ०.०५ आर जागा ग्रामपंचायत कार्यालयासाठी मिळावी व सदर जागा ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीसाठी निश्चित करावी, असा ठराव घेऊन प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर उता-यावर सदयस्थितीत जिल्हा परिषद अहमदनगर अशी नोंद आहे.

तरी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १२८ पोट कलम १(ब) अन्वये जिल्हा परिषदेस आपल्या कार्यापैकी कोणत्याही कार्याच्या प्रयोजनासाठी तिच्यामध्ये निहित असलेली, किंवा निहित करता येईल अशी, किंवा ती संपादन करील अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल अन्यथा ती हस्तांतरित करता येईल. परंतु अशा कोणत्याही मालमत्तांचे कोणतेही संपादन, भाडेपट्टा, विक्री किंवा हस्तांतरण हे नियमांव्दारे विहित करण्यात येईल अशा प्राधिका-याच्या किंवा अधिका-याच्या पूर्वमंजुरीवाचून विधिग्राह्य असणार नाही.

सबब, सदर नियमानुसार मौजे खानापुर, ता.अकोले ग्रामसभा ठराव क्र.१०, दि.३१.०५.२०२५ नुसार भूमापन क्र.१७/१३ मध्ये ०.७१ आर क्षेत्रातील उर्वरित शिल्लक ०.०५ आर जागा ग्रामपंचायत खानापुर, ता.अकोले यांना हस्तांतरित करणेकामी संदर्भ क्र.३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करणेस सद्यस्थितीत जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे विद्यमान मा.अध्यक्ष /मा.उपाध्यक्ष/सदस्य यांचे कार्यकाळाची मुदत संपलेली असल्याने ग्रामविकास विभाग यांचेकडील दि. १३ सप्टेंबर २०२२ चे महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार सध्या सर्व प्रशासकीय अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना असल्याने त्यास मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजुरी घेणे आवश्यक राहील. सोबत सदर प्रस्ताव सादर केला आहे.

**ठराव क्र ४२५**– अकोले या आदिवासी बहुल तालुक्यातील खानापुर हि अतिशय लहान ७ सदस्यीय ग्रामपंचायत आहे. सदर ग्रामपंचायतीला ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध नाही. ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्राचे भुमापन क्र.१७/१३ क्षेत्र ०.७१ आर ही जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मालकीची असुन त्यामध्ये जिल्हा परिषदेचे अतिथी गृह सोडले तर उर्वरित सर्व जागा बखळ पडलेली आहे. खानापुर ग्रामपंचायती अंतर्गत लोकवस्ती विखरुलेल्या स्वरुपात असल्याने सर्व वस्त्यांचे मध्यवर्ती ठिकाण हे भूमापन क्र.१७/१३ मधील ०.७१ आर पैकी सोबत जोडलेल्या नकाशाप्रमाणे ०.०५ आर क्षेत्र पश्चिम दक्षिण कोप-यात अकोले शेरणखेल रस्त्यालगत ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकामाकरीता मिळणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ नुसार सादर करण्यात आलेला आहे.

मौजे खानापुर,ता.अकोले ग्रामसभा ठराव क्र.१०, दि.३१.०५.२०२५ नुसार खानापुर गावासाठी नवीन ग्रामपंचायतीची दि. १०.०१.२०२३ रोजी स्थापना झाली असुन ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र इमारत नाही. यावर ग्रामसभेत सविस्तर चर्चा होऊन भूमापन क्र.१७/१३ मध्ये ०.७१ आर क्षेत्र असुन त्यात विश्रामगृहाचे बांधकाम केलेले असून उर्वरित जागा शिल्लक आहे. शिल्लक असलेल्या क्षेत्रातुन ०.०५ आर जागा ग्रामपंचायत कार्यालयासाठी मिळावी व सदर जागा ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीसाठी निश्चित करावी, असा ठराव घेऊन प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर उता-यावर सदयस्थितीत जिल्हा परिषद अहमदनगर अशी नोंद आहे.

तरी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १२८ पोट कलम १(ब) अन्वये जिल्हा परिषदेस आपल्या कार्यापैकी कोणत्याही कार्याच्या प्रयोजनासाठी तिच्यामध्ये निहित असलेली, किंवा निहित करता येईल अशी, किंवा ती संपादन करील अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल अन्यथा ती हस्तांतरित करता येईल. परंतु अशा कोणत्याही मालमत्तांचे कोणतेही संपादन, भाडेपट्टा, विक्री किंवा हस्तांतरण हे नियमांव्दारे विहित करण्यात येईल अशा प्राधिका-याच्या किंवा अधिका-याच्या पूर्वमंजुरीवाचून विधिग्राह्य असणार नाही.

सबब, सदर नियमानुसार मौजे खानापुर, ता.अकोले ग्रामसभा ठराव क्र.१०, दि.३१.०५.२०२५ नुसार भूमापन क्र.१७/१३ मध्ये ०.७१ आर क्षेत्रातील उर्वरित शिल्लक ०.०५ आर जागा ग्रामपंचायत खानापुर, ता.अकोले यांना हस्तांतरित करणेकामी संदर्भ क्र.३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करणेस सद्यस्थितीत जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचे विद्यमान मा.अध्यक्ष /मा.उपाध्यक्ष/सदस्य यांचे कार्यकाळाची मुदत संपलेली असल्याने ग्रामविकास विभाग यांचेकडील दि. १३ सप्टेंबर २०२२ चे महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार सध्या सर्व प्रशासकीय अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना असल्याने, सदर विषयास या ठरावान्वये सर्वानुमते मंजुरी देत आहे.

**विषय क्रमांक ७–** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत सन 2026-27 चा लेबर बजेट व नियोजन आराखडयास जिल्हा परिषद सर्वसाधारण मंजूरी घेणेबाबत.

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मा.केंद्र शासनाचे पत्रक्र. G-31011/10/2025 RE-V(393829) दि. 26 सप्टेंबर 2025व मा. आयुक्त (मनरेगा), नागपूर यांचे कडील पत्र क्र. आयुक्तालय/मगांराग्रारोहयोमहा/लेब 2026-27/3422/2025दि. 01 ऑक्टोबर 2025 अन्वयेसन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडा तयार करणेबाबतचे निर्देश शासन स्तरावरून प्राप्त आहेत.

**नियमातील तरतूद :-**

मा. केंद्र शासनाचे पत्रक्र. G-31011/10/2025 RE-V(393829) दि. 26 सप्टेंबर 2025व मा. आयुक्त (मनरेगा), नागपूर यांचे कडील पत्र क्र. आयुक्तालय/मगांराग्रारोहयोमहा/लेब 2026-27/3422/2025दि. 01 ऑक्टोबर 2025 अन्वयेसन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडयास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या बैठकीत मान्यता घेणे.

**विभागाचा अभिप्राय :-**

शासनाकडील प्राप्त निर्देशन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत तालुका स्तरावर ग्रामपंचायत मार्फत सन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडा तालुका स्तरावर प्राप्त झालेला आहे. सदर तालुका स्तरावर प्राप्त ग्रामपंचायत निहाय आराखडयास तालुका स्तरीय पंचायत समिती मासिक सभेची मंजुरीसह तालुक्याचा एकत्रित आराखडा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रोहयो शाखा यांचे कडे प्राप्त झालेला असून सदरचा आराखडा मा. उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांचे मार्फत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकामी या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. सदर प्राप्त जिल्ह्याच्या एकत्रित सन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडयास मंजूरी मिळणेबाबत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या बैठकीत विषय विषयसूची मध्ये घेऊन मंजूरी मिळावी ही विनंती.

**ठराव क्र ४२६ –** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत केंद्र शासनाकडील संदर्भ क्र. 1 व मा. आयुक्त (मनरेगा), नागपूर यांचे कडील संदर्भ क्र. 2 च्या पत्रान्वयेसन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडा तयार करणेबाबतचे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

शासनाकडील प्राप्त निर्देशन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत तालुका स्तरावर ग्रामपंचायत मार्फत सन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडा तालुका स्तरावर प्राप्त झालेला आहे. सदर तालुका स्तरावर प्राप्त ग्रामपंचायत निहाय आराखडयास तालुका स्तरीय पंचायत समिती मासिक सभेची मंजुरीसह तालुक्याचा एकत्रित आराखडा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रोहयो शाखा यांचे कडे प्राप्त झालेला असून सदरचा आराखडा मा. उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांचे मार्फत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणेकामी या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. सदर प्राप्त जिल्ह्याच्या एकत्रित सन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडयास संदर्भ क्र. 1 व 2 अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत उपजिल्हाधिकारी (रोहयो) अहिल्यानगर यांचे मार्फत तालुकास्तरावरीलप्राप्त जिल्ह्याच्या एकत्रितसन 2026-27 चे समृद्धीलेबर बजेट / नियोजन आराखडयास मंजूरी देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक ८**– जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत अधिकारी /कर्मचारी यांच्या जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम सन २०२६ तसेच सादिल खर्चास पुनर्नियोजनाद्वारे निधी मिळणेबाबत.

प्रस्तावना-मा.पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांच्या दिनांक ३०/१/२०२६ ते 1/2/2026 या कालावधित जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रम आयोजीत करण्याचे निश्चित झाले आहे. क्रिडा स्पर्धामध्ये क्रिकेट, फुटबॉल, कबडडी, खो.खो. हॉलीबॉल,बास्केट बॉल, कॅरम, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दीबळ, धावणे (100/200/400 मी.) थ्रो बॉल, लिंबु चमचा इ.खेळाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच सांस्कृतीक कार्यक्रमात नृत्य, एकांकीका, विनोदी कार्यक्रम, नाटक, लावणी, भजन,वाद्य स्पर्धा गायन. इ.समावेश करण्यात आला आहे. सदरच्या कार्यक्रमासाठी 14 पंचायत समिती व मुख्यालयातुन एक हजार ते दिड हजार मा.अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

क्रिडा स्पर्धेसाठी आवश्यक ते क्रिडा साहित्य जसे टि-शर्ट, ट्रॅकसुट, स्पोर्ट शुज, तसेच मंडप, लाईट, स्पिकर, जनरेटर,स्टेज, पंचांचे मानधन, प्रशस्तीपत्रक, ट्रॉफी, खुर्च्या, मान्यवरांचे स्वागतासाठी बुके, तसेच कार्यक्रमाचे फोटा व व्हिडीओ शुटींग व क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रमासाठी दिनांक ३०/१/२०२६ ते १/२/२०२६ या कालावधित उपस्थित राहणारे अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी दोन वेळेचे जेवण/नाष्टा/चहा इ.व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकरीता अंदाजे रक्कम रु.१४,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

सन २०२५/२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हास्तरीय मा.पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी क्रिडास्पर्धा आयोजीत करणे, लेखाशिर्ष ०२९०९ (२५१५-२०२१) मध्ये एकुण ७,००,०००/- लक्ष तरतुद करण्यात आली असुन त्यापैकी रु.२,४९,६९५/- लक्ष खर्च झाले असुन रक्कम रु.४,५०,३०५/- शिल्लक आहे. सबब उर्वरीत आवश्यक रक्कम रु.४,००,०००/- पुनर्नियोजनाद्वारे उपलब्ध करणे उचित होईल.

तसेच जि.प.सेस लेखार्ष २५१५-२००८-२९०४ अंतर्गत सन २०२५-२६ करीता रक्कम रु.४०,००,०००/- तरतुद करण्यात आली असुन आजअखेर २९,१३,२५२/- खर्च झाले आहेत व रक्कम रु.१०,८६,७४८/-शिल्लक आहे, तरी मार्च २०२६ अखेर संभाव्य खर्चाचा विचार करता रक्कम रु.४,९५,०००/- पुनर्नियोजनाद्वारे उपलब्ध करणे उचित होईल यास्तव सादर.

**ठराव क्र ४२७**– मा.पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारी यांच्या दिनांक ३०/१/२०२६ ते ०१/०२/२०२६ या कालावधित जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रम आयोजीत करण्याचे निश्चित झाले आहे. क्रिडा स्पर्धामध्ये क्रिकेट, फुटबॉल, कबडडी, खो.खो. हॉलीबॉल,बास्केट बॉल, कॅरम, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दीबळ, धावणे (100/200/400 मी.) थ्रो बॉल, लिंबु चमचा इ.खेळाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच सांस्कृतीक कार्यक्रमात नृत्य, एकांकीका, विनोदी कार्यक्रम, नाटक, लावणी, भजन,वाद्य स्पर्धा गायन. इ.समावेश करण्यात आला आहे. सदरच्या कार्यक्रमासाठी १४ पंचायत समिती व मुख्यालयातुन एक हजार ते दिड हजार मा.अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

क्रिडा स्पर्धेसाठी आवश्यक ते क्रिडा साहित्य जसे टि-शर्ट, ट्रॅकसुट, स्पोर्ट शुज, तसेच मंडप, लाईट, स्पिकर, जनरेटर,स्टेज, पंचांचे मानधन, प्रशस्तीपत्रक, ट्रॉफी, खुर्च्या, मान्यवरांचे स्वागतासाठी बुके, तसेच कार्यक्रमाचे फोटा व व्हिडीओ शुटींग व क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक कार्यक्रमासाठी दिनांक ३०/१/२०२६ ते १/२/२०२६ या कालावधित उपस्थित राहणारे अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी दोन वेळेचे जेवण/नाष्टा/चहा इ.व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकरीता अंदाजे रक्कम रु.१४,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

सन २०२५/२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हास्तरीय मा.पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी क्रिडास्पर्धा आयोजीत करणे, लेखाशिर्ष ०२९०९ (२५१५-२०२१) मध्ये एकुण ७,००,०००/- लक्ष तरतुद करण्यात आली असुन त्यापैकी रु.२,४९,६९५/- लक्ष खर्च झाले असुन रक्कम रु.४,५०,३०५/- शिल्लक आहे. सबब उर्वरीत आवश्यक रक्कम रु.४,००,०००/- पुनर्नियोजनाद्वारे उपलब्ध करणे आवश्यक आहे.

तसेच जि.प.सेस लेखार्ष २५१५-२००८-२९०४ अंतर्गत सन २०२५-२६ करीता रक्कम रु.४०,००,०००/- तरतुद करण्यात आली असुन आजअखेर २९,१३,२५२/- खर्च झाले आहेत व रक्कम रु.१०,८६,७४८/-शिल्लक आहे, तरी मार्च २०२६ अखेर संभाव्य खर्चाचा विचार करता रक्कम रु.४,९५,०००/- पुनर्नियोजनाद्वारे उपलब्ध करण्यास या ठरावाव्दारे प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सचिव,
सर्वसाधारण सभा तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर